**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १७ ब

ॐ ॐ ॐ

**व्यक्तिमत्त्व, प्रामाणिकपणा आणि सचोटी यामुळे जगातील प्रत्येक गोष्ट मिळेल.**

भगवान पुढे म्हणाले, ''मुलांनो, मला तुम्हाला सांगायचं आहे की, तुमच्याकडे व्यक्तिमत्त्व, प्रामाणिकपणा आणि सचोटी असली पाहिजे. त्यामुळे तुम्हाला जगातील सर्व काही मिळेल.''

माझ्या मित्रांनो, आताच फक्त तीन दिवसांपूर्वी कॅलिफोर्नियातील अर्थशास्त्र विभागाच्या एका प्राध्यापकांनी आपल्या संस्थेत भाषण दिले. ते काय बोलले ते मी स्वामींकडे निवेदन केले. या प्राध्यापकांनी आपल्या संस्थेमध्ये सत्यसाईंच्या 'मानवी मूल्याच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात भाग घेणाऱ्या दोन हजार विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात असं दिसून आलं की दुसऱ्या इतर मुलांच्या तुलनेत ही सर्व मुले जीवनात फार छान स्थिरावली आहेत. कारण त्यांच्या कळकळीमुळे, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि कामातील कौशल्यामुळे त्यांनी अग्रेसर कंपन्यांमध्ये उच्च स्थान मिळवलं आहे. या कॅलिफोर्नियाचे हे प्राध्यापक म्हणाले, ''सत्यसाई मानवी मूल्यशिक्षणामुळे इथे भरभराट घडवून आणत आहे याचे हे जिवंत उदाहरण आहे. ते मरणोत्तर तुम्हाला स्वर्गात नेता येत नाही. नाही, नाही, इथेच फक्त! सत्यसाई मानवी मूल्यांचे शिक्षण खरोखर विलक्षण शिक्षण आहे.''

मी पहिल्या भागातच स्वामी मुलांना काय म्हणाले होते ते सांगितले आहे. प्रामाणिकपणा, सचोटी आणि व्यक्तिमत्त्व मिळवण्याकरता बाबांनी एक उदाहरण दिले आहे. ''मुलांनो, इकडे पहा. साधारण ४० वर्षापूर्वी बाबा बंगलोरमध्ये होते. मी माझ्या गाडीमध्ये होतो. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या बिल्डिंगवरून जात होतो. तुम्ही भारतीय शास्त्रसंस्थेबद्दल ऐकलंच असेल. त्या संस्थेच्या उच्च दर्जाबद्दल ती आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहे. त्या संस्थेतील बरेचसे प्राध्यापक स्वामींचे भक्त आहेत. एक दिवस स्वामी त्या परिसरातून जात होते. ते गाडीमध्ये असताना त्यांनी झाडाखाली बसलेल्या एका मुलाला पाहिलं. ती वेळ भर दुपारची होती आणि तो मुलगा लांबट, गंभीर चेहऱ्याने उभा होता. असे लांब, गंभीर चेहरे पाहून स्वामी अस्वस्थ होतात. असा लांब, गंभीर चेहऱ्याचे स्वामींना वावडे आहे. त्यांना हसरे चेहरे आवडतात. त्यामुळेच त्यांना परदेशी लोक पसंत असतात. ते लोक नेहमी हसतमुख असतात. स्वामींना त्यांचे चेहरे पाहायला आवडत असे. त्या गंभीर चेहऱ्याच्या, निराश दिसणाऱ्या मुलाचा चेहरा पाहून भगवान अस्वस्थ झाले. त्यांनी गाडी थांबवून विचारलं, ''अरे ए, मुला! इकडे ये. तू इतका दुःखी का?'' ''स्वामी, मी आत्ताच एक मुलाखत देऊन आलो. त्यांनी मला काही प्रश्न विचारले त्याला मी नीट उत्तरे देऊ शकलो नाही. म्हणून त्यांनी मला निघून जायला सांगितलं. मला आता नोकरीची फारच निकड आहे. मी फार निराश झालो आहे. मी तेथील संचालकांना माझ्या अर्जाचा पुनर्विचार करण्याची विनंती केली. पण ते म्हणाले, ''या खोलीतून बाहेर जा!'' मी पूर्णपणे हताश झालो आहे, स्वामी.''

स्वामींना त्या मुलाची दया आली. ''माझ्या सल्ल्याप्रमाणे कर.'' ''स्वामी, मी तसंच करीन.'' ''तू इथं कसा आला आहेस?''

''संस्थेने मला प्रवासभत्ता दिला. त्या पैशांनी आलो.'' ''तू तुझे स्वतःचे पैसे खर्च केलेस का?'' ''नाही

स्वामी.'' ''मग तू इथे कसा आलास?'' ''संस्थेने मला प्रवासखर्चासाठी काही भत्ता दिला. त्यामुळे मी इथे येऊ शकलो.'' ''ते पैसे तुला पुरेसे होते का? तुला आणखी पैशाची गरज आहे का?''

''स्वामी, त्यांनी मला पुरेसे पैसे पाठवले होते. माझ्याजवळ अजून त्यातील ८ रुपये शिल्लक आहेत.'' ''ओह, असं आहे तर! आता मी तुला सांगतो, तू इथेच उभा राहा. या संस्थेचे संचालक इथून गाडीमधून जात असतील. तू म्हण, ''सर, सर!'' तेव्हा ते विचारतील तुला काय पाहिजे आहे? निघून जा. तू नोकरीला अपात्र आहेस. ते तुला असं म्हणतील पण तू त्यांना सांग, सर, मी आता तुमच्याकडे नोकरीसाठी थांबलेलो नाही. तुम्ही मला प्रवासखर्चासाठी रु. २०/- दिले होते. मी त्यातील रु. १२/- खर्च केलेत. त्यातील रु. ८/- फक्त अजून माझ्याकडे शिल्लक आहेत. मी ते पैसे परत करण्यासाठी येथे थांबलो आहे.'' तू त्यांना हे असे सांग आणि मग बघ काय होते ते.'' (हशा) अणि मिस्कील भगवान तेथून निघून गेले. (हशा) अपेक्षेप्रमाणेच!

''संचालक साहेब!'' ''येथून निघून जा.''

''नाही सर, मी तुम्हाला माझ्या प्रवासखर्चातील उरलेले ८ रु. परत देण्यासाठी इथे थांबलो आहे.'' मग संचालक म्हणाले, ''आम्हाला आमच्या संस्थेमध्ये असेच प्रामाणिक विद्यार्थी हवे आहेत. (हशा.) आम्हाला असे प्रामाणिक आणि नेक, सच्चे विद्यार्थीच हवे आहेत. आज दुपारपासून येऊन आमच्या संस्थेत कामावर रुजू हो.''

स्वामी आपल्या गाडीत रस्त्याच्या टोकाला या मुलाचे निरीक्षण करत थांबले होते. तो मुलगा धावतच जाऊन स्वामींच्या पाया पडला. ''स्वामी, मला नोकरी मिळाली!'' ''होय, जेव्हा माझ्या आज्ञा आणि माझी तत्त्वे पाळता, जेव्हा तुमचेकडे प्रामाणिकपणा आणि सचोटी असते, तेव्हा तुम्हाला कुठेही नोकरी मिळेल. तुम्ही यशस्वी व्हाल.'' बाबा असं म्हणाले.

''तुमच्या मार्गदर्शकाला अनुसरा''

नंतर स्वामींनी तिथे असलेल्या पीएच.डी.चा अभ्यास आणि संशोधन करणाऱ्या एका विद्यार्थ्याकडे पाहिले. ते म्हणाले, ''मुला, तू कोणते काम करत आहेस?'' ''स्वामी, मी संशोधन करत आहे.''

''आहे! ठीक आहे. तुझे संशोधनाचे काम कसे चालले आहे?''

''स्वामी, खूप छान!''

''तू तुझा प्रबंध किंवा संशोधनलेखनाचे काम सुरू केलंस का?''

''होय, स्वामी. मी लिहायला सुरूवात केली आहे.''

''तू काय लिहितो आहेस?''

''स्वामी, तुम्ही सांगितलेलं सर्व लिहीत आहे.''

''मी सांगितलेलं सर्व काही तू लिहिलं पाहिजेस असं नाही. तुला तुझ्या संशोधनातील मार्गदर्शक आहे. तू त्या मार्गदर्शकाच्या सूचनांप्रमाणे करायला हवेस. तुझ्या प्रबंधामध्ये मी काय बोललो ते लिहावयास नको, हे लक्षात ठेव.'' मग त्यांनी त्या मुलाकडे पाहिलं आणि म्हणाले, ''विवाहाच्या वेळी तिथे धर्मगुरू असेलच, तो सूचनाही देईल, पण नवरीच्या बोटात फक्त नवरदेवच अंगठी घालेल, तसाच मी फक्त धर्मगुरू आहे. तुला तुझ्या मार्गदर्शकाकडून ज्या सूचना मिळतात, त्या तू पाळल्या पाहिजेस.''

''देवत्वाकडे जाण्यासाठी वेगळा मार्ग नसतो, ते फक्त आकलन असतं.''

या मालिकेतील शेवटच्या प्रसंगाबद्दल बोलताना, देवत्व आणि जागृत राहणं याबद्दल बोलताना मला हा प्रश्न विचारावासा वाटला. ''स्वामी, देवत्व आणि सजगता यासाठी काही खास मार्ग आहे का?'' बाबा म्हणाले, ''जर असा मार्ग असेल तर तिथे त्याचं नाव आणि स्वरूप असेलच, पण देवत्व हे नावारूपाच्या

पलीकडे आहे. देवत्वाकडे जाण्याचा असा निराळा मार्ग नसतो.'' आता ह्याबरोबरच वेळ नसल्यामुळे आम्ही या विषयावरील प्रश्नोत्तरे संपवली.

## ''जानेवारी २००१ मधील काही प्रसंग''

आता मी जानेवारी २००१ या मुद्याकडे वळतो. तुमच्या माहितीसाठी, माझे तेलगु सनातन सारथी ह्या मासिकामध्ये आलेले माझे लेख पाहा. त्यात बाबा आणि विद्यार्थ्यांची संभाषणे आहेत. ते त्या महिन्यांशी मिळते जुळते आहेत. याबद्दलचे पुनर्लेखनाचे हक्क नाहीत, त्याची काळजी करू नका.'' (हशा) मला आश्चर्य वाटते की लोकांना पुनर्लेखनाचे अधिकार का हवे असतात? कदाचित काही माणसांना ह्या लेखनातील माहितीचा दुरूपयोग करायचा असेल. असा दुरूपयोग न होण्यासाठी पुनर्मुद्रणाचे अधिकार हवे असतील. खरं म्हणजे परमेश्वराला कुठलंच बंधन नाही. त्यांचे संदेश सर्वांसाठी मुक्त आहेत, तुम्ही स्वतंत्र आहात, मीही तसाच मोकळा आहे. ख्रिस्ताला बायबलमधील लिखाणाचे अधिकार नाहीत, कृष्णाला भगवत्‌गीतेचे अधिकार का असावेत? हा तर हिमालयाएवढा प्रचंड अहंकार आहे. तरीही मी त्याच्या विरुद्ध नाही. कधी कधी अशा मुद्रण अधिकाराची जरूरी असते. कारण त्याचा दुरूपयोग केला जाऊ नये इतकंच!

***